-जयेश चितलिया

# म्युच्युअल फंडासह प्रत्येक गुंतवणुकीत नॉमिनी करून ठेवण्यात शहाणपण आहे

जीवनात जर कुठल्या बाबतीत एकदम निश्चित असाल तर ती म्हणजे मृत्यू, जरी आपण येथे जीवन-मृत्यूच्या तत्त्वज्ञानावर चर्चा करत नसलो तरी व्यावहारिक बाबींमध्ये व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याच्या कुटुंबियांना व्यक्तीच्या मालमत्तेच्या-गुंतवणुकीच्या बाबतीत त्यांच्या हक्कासाठी हैराण व्हावे लागणार नाही यासाठी नॉमिनीचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. समजा जर श्री. एक्सचा मृत्यू झाला आणि त्याच्या बँक खात्यात किंवा गुंतवणुकीत कोणीही नॉमिनी नसेल तर काय होईल? त्याच्या कुटुंबाला ते पैसे परत मिळावेत म्हणून त्यांना एकतर श्री. एक्सच्या मृत्युपत्राचा आधार घ्यावा लागेल किंवा त्यांचा मालमत्तेवर कायदेशीर हक्क आहे हे सिद्ध करावे लागेल, जी लांबलचक प्रक्रिया आहे आणि हैराण करणारी पण ठरू शकते.

नॉमिनेशन हा शब्द आपण सर्वांनी गेल्या अनेक दिवसांत अनेकदा ऐकला असेल. अलीकडे, नियामक संस्था सेबी (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) ने म्युच्युअल फंडांना त्यांच्या धारकांकडून अनिवार्य नॉमिनी नोंदणी करण्यास सांगितले आहे. याशिवाय डिमॅट खात्यांमध्येही नॉमिनी असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी आधी 31 मार्च 2023 पर्यंत कालावधी निश्चित करण्यात आला होता, जो नंतर सप्टेंबर-2023 पर्यंत वाढवण्यात आला आणि आता हा कालावधी 30 जून 2024 पर्यंत वाढवण्यात आला आहे. बरं, नॉमिनेशन करणे अनिवार्य आहे, अन्यथा तुमच्या खात्यात युनिट्स किंवा शेअर्स जुलै 2024 पासून जमा केले जाऊ शकतात, परंतु हे शेअर्स बाहेर जाऊ शकत नाहीत, म्हणजे तुम्ही त्यांची विक्री करू शकणार नाही. मात्र, ज्यांनी नॉमिनेशन करून ठेवले आहे, त्यांना कोणतीही अडचण येणार नाही. लक्षात ठेवा, गुंतवणूकदार त्याला हवे तेव्हा त्याचे नॉमिनी बदलू शकतो.

खरं तर, नॉमिनेशन यासाठी केले जाते जेणेकरून व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याने म्युच्युअल फंड योजनांमध्ये किंवा स्टॉकमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी कोणीतरी असेल. आता गुंतवणूक करणाऱ्या नवीन गुंतवणूकदारांसाठी तर हे बंधनकारक झालेच आहे, परंतु जुन्या गुंतवणूकदार-धारकांनी नॉमिनेशन केले नसेल तर त्यांना सुद्धा आत्ताच नॉमिनेशन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्यांनी त्यांच्या डिमॅट खात्यात युनिट्स ठेवले आहेत ते त्यांच्या डीमॅट खात्यात नॉमिनी ठेवू शकतात, बाकी भौतिक युनिट्सच्या बाबतीत त्यांना नॉमिनेशन अर्ज भरावा लागेल, ज्यामध्ये नॉमिनी व्यक्तीचे तपशील सादर करावे लागतील.

**नॉमिनी असण्याचे फायदे**

BSE - INTERNAL

नॉमिनी असण्याचा फायदा असा आहे की युनिट धारकाचा मृत्यू झाल्यास, त्याच्या खात्यातील गुंतवणूक नॉमिनी व्यक्तीच्या खात्यात सहजपणे हस्तांतरित केली जाऊ शकते. जर कोणीही नॉमिनी नसेल तर मृत व्यक्तीच्या वारसांना मृत्युपत्र किंवा इतर कागदपत्रे सादर करून त्यांच्या हक्कांचा दावा करावा लागेल आणि ते सिद्ध करण्यासाठी लांबलचक प्रक्रियेतून जावे लागेल. असे करण्यासाठी कायदेशीर वारस म्हणून प्रमाणपत्र सादर करावे लागेल. इतर कायदेशीर वारसांकडून एनओसी (ना हरकत प्रमाणपत्र) आणून जमा करावे लागेल. हे केल्यानंतरच युनिट्स त्यांच्या खात्यात हस्तांतरित करता येतील. असे करण्यासाठी बराच वेळ लागू शकतो आणि हे करताना कुटुंबियांमध्ये गोंधळ किंवा विवाद देखील होऊ शकतात. थोडक्यात, तुम्हाला तुमच्या हक्कांसाठी विवाद आणि लांबलचक प्रक्रियेतून जावे लागेल.

नॉमिनेशन प्रक्रिया किचकट नसून सोपी आहे. यात एक भौतिक फॉर्म भरायचा असतो, ज्यामध्ये प्रत्येक धारकाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटच्या वेबसाइट्सद्वारे ऑनलाइन देखील केली जाऊ शकते. वास्तविक हे काम धारक व त्यांच्या वारसांच्या हिताचे आहे. प्रत्येक फंड हाऊस देखील हे कार्य करत आहे.

**नॉमिनीविना कोट्यावधी रुपये दाव्या शिवाय पडून**

एक गोष्ट लक्षात ठेवा की तुम्ही जेव्हा कधी गुंतवणूक कराल तेव्हा ती संभव आणि परिस्थितीशी अनुकूल असल्यास संयुक्त नावाने करा. उदाहरणार्थ पती-पत्नी, पिता-पुत्र किंवा पिता-पुत्री इत्यादींच्या नावावर. ज्यामध्ये कधी तुम्ही प्रथम धारक असता तर कधी पत्नी प्रथम धारक असते. मुलांना नॉमिनी करा. हे विशेष लक्षात ठेवले पाहिजे की नॉमिनी आपोआप मालमत्तेचा मालक होत नाही, त्याला त्याची काळजी घ्यावी लागते, तर उर्वरित मालमत्तेचा अधिकार मृत्यूपत्राच्या अनुसार ज्याचे नाव आहे त्यांच्याकडेच राहतो. आत्तापर्यंतच्या अनुभवावर आधारित सेबी आणि सरकारने नॉमिनी नियम आणला आहे. आजही सरकारी तिजोरीत नॉमिनी किंवा वारस नसल्यामुळे कोट्यवधी पैसे किंवा स्टॉक्स-म्युच्युअल फंड युनिट्स सारख्या मालमत्ता दाव्याविना पडून (अनक्लेम्ड) आहेत, ज्यावर कायदेशीर दावा न केल्यास काही वर्षांनी सरकार आपल्या ताब्यात घेते. अशा लाभांश किंवा शेअर्सची मोठी रक्कम सरकारकडे पडली आहे. तथापि, हा पैसा नंतर गुंतवणूकदार संरक्षण निधी (इन्व्हेस्टर्स प्रोटेक्शन फंड) साठी वापरला जातो. तसेच हा पैसा गुंतवणूकदारांचे संरक्षण, मार्गदर्शन-जागृती-शिक्षण यासाठी वापरला जातो.

BSE - INTERNAL